# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक १५ वा
२८ डिसेंबर १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे


# केवळ स्वातंत्र्यासाठी.....

## – शरद जोशी

गेल्या निवडणुकीत बळीराज्याचा कार्यक्रम समोर ठेवून आपण निवडणुका लढवल्या. निवडणुका पार पडल्या आणि बळीराज्याचा प्रश्न बाजूला राहिला, शेतकऱ्याला दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांना लुटलं जातं हा प्रश्न बाजूला राहिला आणि समुद्रात हेलकावे खाणारी ही बोट कोणत्या दिशेने चालायला लागली आहे याचं अजूनही निवडणूक जिंकलेल्यांनाही आणि निवडणूक हरलेल्यांनाही आश्चर्य वाटतं आहे. मोठमोठ्या सभा घेणारे, सरकारची सबंध सूत्रं आपल्या हाती आहेत म्हणणारे जी भाषा वापरतात, जे शब्द वापरतात, जे विचार मांडतात ते पाहिल्यानंतर आपण खरंच हिंदुस्थानात आहोत का, आपण खरंच १९९५ सालात आहोत का, अशा प्रकारचे माथेफिरू विचार मोठमोठ्या व्यासपीठांवरून कसे काय मांडले जाऊ शकतात, ज्या भाषणांबद्दल सर्वोच्च न्यायालयसुद्धा हे विचार बेतालपणाचे आहेत असे म्हणते त्या विचारांना या राज्यात सन्मानपूर्वक ऐकले जाते हा काय प्रकार आहे असे अनेक प्रश्न समोर उभे राहातात.

नागपूरच्या अधिवेशनानंतर मी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरलो, गुजरातमध्ये फिरलो, पंजाबमध्ये फिरलो, हरयानामध्ये फिरलो आणि दुर्दैवाने, नागपूरमध्ये परतलो तेव्हा अत्यंत कठीण अशा आजारात सापडलो. ज्या दिवशी पुन्हा दोन पायांवर उभा राहाण्याची शक्ती आली त्यावेळी मी पुन्हा तुमच्यासमोर उभा आहे.

मलासुद्धा प्रश्न पडतो की १९७६ सालापासून मी शेतीमालाचा प्रश्न मांडतो आहे. किती तऱ्हेनं सांगितलं. आईनं आपल्या बाळाला जेऊ घालतांना वेगवेगळ्या युक्त्या वापराव्या तशा सगळ्या युक्त्या मी वापरल्या. हे करून एकच गोष्ट शेतकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला की शेतकरी तितका देशातला गरीब आहे, शेतकरी तितका कर्जबाजारी आहे याचं कारण शेतकऱ्यांच नशीब वाईट आहे हे नाही, शेतकरी अडाणी आहे हे नाही, शेती कशी करायची हे शेतकरी जाणत नाही हेही खरं नाही. प्रचंड कष्ट करून शेती करणारा, हिंदुस्थानातल्या प्रत्येक राज्यातला शेतकरी कर्जात बुडतो आहे याचं कारण एकच - शेतीला आणि शेतकऱ्याला कर्जात बुडवायचं हे धोरण दिल्लीमध्ये ठरलेलं आहे. हा एकच धडा गेली वीस वर्षे मी तुमच्यासमोर मांडतो आहे.

> **१२ डिसेंबर १९९५ रोजी हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिनी नरखेड, जि. नागपूर येथे महाराष्ट्रभरातून आलेल्या स्वातंत्र्ययात्रांच्या एकत्रित सभेसमोर शरद जोशींनी केलेले भाषण म्हणजेच उपोषणाआधीचे प्रकट चिंतन.**

शेतकऱ्याने एक दाणा शेतात पेरला तर त्याचे शंभर दाणे हातात येतात तरी त्याला भीकच मागावी लागते. शहरातल्या कारखान्यामध्ये एक किलो लोखंड टाकलं तर त्यात कणभरही वाढ होत नाही त्या कारखानदारांकडे त्याला भीक मागायला जावं लागतं याचं कारण सरकारने तुमचे शंभर दाणे लुटण्याचं धोरण आखलं आहे हे आहे. गोऱ्या इंग्रजाने हेच केलं, काळा इंग्रज हेच करतो आहे एवढी साधी गोष्ट गेली वीस वर्षे मी तुम्हाला सांगायचा प्रयत्न करतो आहे.

सगळं घरदार उधळून, वेगवेगळ्या तऱ्हेने हा प्रश्न तुमच्या समोर ठेवला. तुरूंगात गेलो; खटले किती लागले त्याचा हिशोब राहिला नाही आणि तरीदेखील माझ्या मनातसुद्धा निराशेचा एक फुटवा येतो की हे सगळं निरर्थक आहे. माधवराव खंडेराव मोरे नाशिकच्या आंदोलनाच्या वेळीही आपल्या फटकळ शब्दांत म्हणाले होते की, 'शरदराव, तुम्ही भलतीच लढाई लढायला जाऊ नका. समोरचा शत्रू केवढा मोठा, आणि तुमची ही फौज काय आहे, ही हिजड्यांची फौज आहे. त्यांना घेऊन कोणती लढाई लढता?' मी स्वतःला शेतकऱ्यांची आई म्हणवून घेऊ इच्छित नाही पण मी हे काम, आईनं बाळाबरोबर जसं वागावं तसं शेतकऱ्यांशी वागून करण्याच व्रत घेतलं आहे.

मग, प्रत्येक मोक्याच्या वेळी असं का होतं?

१९८४ साली आम्ही म्हटलं की 'गावबंदी'चं हत्यार वापरा. तुमच्यापुढे गरीबी हटविण्याचे खोटे कार्यक्रम घेऊन येतील त्याना म्हणा हे बाकी काही आम्हाला सांगू नका, इंदिरा गांधी मोठ्या का मोरारजी देसाई मोठे यात आम्हाला काही स्वारस्य नाही, आम्हाला फक्त एका प्रश्नाच उत्तर द्या की एवढे कष्ट करूनसुद्धा आमचे पणजोबा कर्जात मेले, आजोबा कर्जात मेले आणि आम्हीसुद्धा कर्जातच बुडतो आहोत याचं कारण काय? इतकं सांगूनसुद्धा, डोक्यावर एवढं मोठं कर्जाचं ओझं असतांना लोकांनी मतं कुणाला दिली? राजीव गांधींना. कारण काय तर त्याची माय गेली त्याचं दुःख वाटलं आणि आमच्या पोराच्या तोंडाला दुधाची वाटी लागत नाही याचं दुःख विसरून त्याला मतं दिली.

१९८९ साली आम्ही म्हटलं की अरे, हजारो वर्ष कधी शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज मिटलं नाही, मिटायची वेळ आता आली आहे, कर्जाचा एक हप्ता चुकवण्याकरिता कुणाकुणाकडे खेटे घालता; आता कुणाकडेच खेटे घालायची गरज नाही, एका चिठ्ठीवर सगळ्या शेतकऱ्यांनी मिळून लिहा की आम्हाला कर्जमुक्ती हवी आणि त्या साली मी कर्जमुक्ती मिळविण्याचं आश्वासन दिलं होतं. आणि लोकांनी मतं कुणाला दिली? 'अयोध्ये'ला मतं दिली; जो भाऊ आपल्या समोर, आपल्या शेजारी शेती करतो तो कोणा मुसलमान आईबापाच्या पोटी जन्मला म्हणून तो देशद्रोही आहे असा द्वेष शिकविणाऱ्या माणसांना आम्ही मतं दिली.

१९९४ साली खूप आशा वाटली होती. ८० सालापासून आम्ही जे जे मांडत होतो त्याचा पुरावा समोर आला. ८० साली मी शेतकऱ्यांना म्हटलं तुमची दिल्लीहून लूट होते आहे. तेव्हा सगळे लोक चेष्टा करायचे की आपलंच सरकार आपलीच लूट करतं असं कुठं असतं काय? एक्याण्णवब्याण्णव साली डंकेल प्रस्तावाच्या निमित्तानं आपल्या हाती पुरावा आला. सरकारनं स्वतः कबुलीजबाब दिला की आम्ही शेतकऱ्यांना लुटतो, दरवर्षी लुटतो, प्रत्येक वर्षी चोवीस हजार कोटी रुपयांनी लुटतो. (हा निवडणुकीच्या आधीचा आकडा १९८६ ते ८९ चा होता. १९९२-९३ या वर्षी, सरकारने जे नवीन आकडे दिले आहेत त्या आकड्याप्रमाणे आता दरवर्षी शेतकऱ्यांची लूट बेचाळीस हजार सातशे कोटी रुपयांची होते.) १९९४ साली खरंच असं वाटलं की याच्यापेक्षा अधिक भयानक सत्य काय कळायला पाहिजे लोकांना?

स्वातंत्र्यानंतर देशात घडलेल्या महत्त्वाच्या दोन घटना कोणत्या? गांधींचे अर्थशास्त्र मागे टाकून ज्या समाजवादाचा झेंडा घेऊन नेहरूंनी सगळा देश उलटवला तो समाजवाद देशाला घातक आहे हे सिद्ध झालं, समाजवाद सोडून द्यायला लागला, ही एक.

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे, आमचंच सरकार आमच्याच शेतकऱ्यांना चोवीस हजार कोटी रुपयांना लुटत होतं हे सिद्ध झालं.

एवढ्या दोन गोष्टी घडल्यानंतर, देशातील सगळे मुद्दे बाजूला पडतील, सगळे विषय बाजूला पडतील आणि या विषयासंदर्भाने देशाला पुढे दिशा देणारा मार्ग आपण काढू शकू असं वाटलं होतं. उलटं झालं. सत्ता कुणाच्या हाती गेली? काँग्रेसवाले म्हणजे काय मोठे गंगेत न्हाऊन आलेले नव्हते, तेही तितकेच भ्रष्टाचारी, तितकेच गुंडगिरी करणारे; पण त्यांच्या गुंडगिरीलाही थोडी लाजशरम होती. पण, यावेळी सत्ता गेली अशा माणसांच्या हाती, ज्यांच्या गुंडगिरीला काही संकोच नाही. यांच्या हाती सत्ता तुम्हा शेतकऱ्यांच्या मतामुळं आली याचं मलासुद्धा वाईट वाटलं.

आणि मग मलासुद्धा वाटून जातं की काय करावं, या लोकांपुढे काय बोलावं. पण आईच्या बाबतीत म्हटलं जातं की आपल्याच बाळानं जर आपल्याच मांडीवर 'शी' केली तर आई आपली मांडी कापत नाही आणि त्या पोरालाही मारत नाही. पोराला सुधारायचा प्रयत्न करते.

या अशा परिस्थितीत आजचा (१२डिसेंबर १९९५) हा मेळावा इथे (नरखेड जि. नागपूर) होतो आहे. मोठा विशेष मेळावा आहे. नांदेडहून एक स्वातंत्र्ययात्रा आली आहे. इकडे राजुऱ्याहून आली आहे. एक वर्ध्याहून, जळगावहून महिला आघाडीच्या नेतृत्वाखाली मोठं पथक आलं आहे. आणि कोल्हापूर, सांगली, सातारा या महाराष्ट्राच्या दक्षिण टोकाकडील ऊसवाले जिल्हेसुद्धा हजर झाले आहेत. असा कार्यक्रम पूर्वी कधी झाला नव्हता.

नरखेडला कापसाचे ट्रक पुष्कळ आले, त्यातले बरेचसे पांढुर्ण्याला पुढे गेलेत. आता आपण कापूस सीमेपलिकडे घेऊन जाण्याकरिता आलेलो नाही. एक पिशवीभर कापूस, मूठभर कापूस, वातीपुरता कापूस घेऊन आपण आलेलो आहोत. सीमेपलिकडे कापसाचा भाव महाराष्ट्रात सरकारने जाहिर केलेल्या भावापेक्षा कमी आहे; हातात पडणाऱ्या रकमेपेक्षा जास्त आहे किंवा कसे हे तपासावे लागेल. सरकारचे चेक वटणार आहेत का नाही हेही पाहावे लागेल. ग्रेडिंगमधे सरकारचे लोक लबाडी करतात का हाही प्रश्न आहे. पण, सरकारने बोलतांना तरी जो भाव जाहिर केला आहे त्याच्यापेक्षा काही सीमेपलिकडे जास्त भाव मिळणार नाही आणि तरीसुद्धा महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यामध्ये मध्यप्रदेशाच्या हद्दीवरती महाराष्ट्राच्या कोल्हापूरसारख्या दुसऱ्या टोकापासूनचे सर्व शेतकरी जमा झाले आहेत. कशाकरिता?

तिथं जाऊन काही एक पैसा जास्त भाव मिळवायचा नाही. त्यांना मिळवायची फक्त एक गोष्ट. माझा कापूस मी कुठं विकायचा, कसा विकायचा, कोणत्या रूपात विकायचा; सूत करून विकायचा का कापड करून विकायचा, का न्यूयॉर्कला विकायचा का लंडनला विकायचा हे ठरविणारे तुम्ही कोण? मला पैसे मिळोत किंवा न मिळोत, महाराष्ट्रातला भाव कमी आहे का जास्त हा मुद्दा नाही.

स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही असे लोकमान्य टिळक म्हणाले होते. महाराष्ट्र राज्यामध्ये एकाधिकाराच्या नावाखाली, गुलामगिरीच्या नावाखाली सरकार मला तीन हजार रुपये क्विंटल भाव देत असतं इतर कुठेही दोन हजारपर्यंतच भाव चालू असता तरीसुद्धा मी असं म्हटलं असतं की मला स्वातंत्र्य पाहिजे. कारण, स्वातंत्र्य ही काही बाजारात विकायची गोष्ट नाही. माझ्या मनात इच्छा होईल त्याप्रमाणे व्यवसाय करण्याचं स्वातंत्र्य मला पाहिजे. मला नुसताच जास्त भाव पाहिजे असं नाही, मला स्वातंत्र्य पाहिजे.

शेतकऱ्याला स्वातंत्र्याखेरीज दुसरं काहीही नको. एका दाण्याचे शंभर दाणे करणारा, त्याचा परमेश्वर वर बसला आहे, ते शंभर दाणे जोपर्यंत त्याला हातात ठेवता येतात तोपर्यंत त्याला दुसऱ्या कोणाचीही गरज नाही. पण, एकाचे शंभर दाणे करणारा शेतकरी कर्जात राहातो याचं कारण कोणी साम्राज्यवादाच्या नावाखाली, कोणी समाजवादाच्या नावाखाली त्याला वेगवेगळ्या बेड्यांमध्ये अडकवून ठेवतं.

तुम्ही शेतकऱ्याच्या घरी जन्मलात आणि शेतकऱ्याच्या घरी वाढलात. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातापायात किती बेड्या आहेत याची कल्पना तुम्हाला जरा कमी असेल. मी शेती करायला लागलो, माझ्या पाच पिढ्यांत कोणी शेतकरी नसतांना मी शेती करायला लागलो. मला पहिली गोष्ट सांगितली गेली की तुम्ही जन्माने शेतकरी नाही त्यामुळे तुम्हाला शेती करता नाही येणार. शेती करायलासुद्धा परवानगी काढावी लागते आणि ती ऐऱ्यागैऱ्याला मिळत नाही.

जमीन घ्यायची झाली तर आधी मिळायची नाही; मिळालीच तर जमीन किती घ्यायची, सीलिंग काय असणार ते सरकारने

ठरवायचं; जमीन घेतली, शेती करायला लागलात आणि कुणा पुढाऱ्याची नजर तुमच्या जमिनीवर गेली तर ती ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला; शेती करताना तुम्ही बियाणं कोणतं वापरायचं, खतं कोणती वापरायची ते सरकारच ठरवणार; परदेशातून चांगलं बियाणं आणतो म्हणालात, चांगली साधनं आणू म्हणालात तर ते शक्य नाही. आम्ही शेती करतो ते सरकारी ट्रॅक्टर घेऊन, सरकारी खतं घेऊन, सरकारी औषधं घेऊन, सरकारी बियाणं घेऊन आणि सरकारी वीज घेऊन.

मागे माझ्याकडे परदेशातून काही पाहुणे आले होते. ते माझ्या घरी बसले असतांना चार वेळा वीज गेली. त्यामुळे प्रत्येक वेळी मोटार बंद पडली, एक लहान मोटार जळाली. ते म्हणाले, या परिस्थितीत तुम्ही शेती कशी करता हा प्रश्न दूरच राहू द्या, इथं माणसं जगतातच कशी? अशा तऱ्हेची सरकारी व्यवस्था तयार केलेली आणि त्यातच आम्ही शेती करायची! शेतामध्ये काय पिकावायचं आमच्या हाती नाही, कसं पिकवायचं ते आमच्या हाती नाही, कुठं विकायचं ते आमच्या हाती नाही, कधी विकायचं अमाच्या हाती नाही. कापूस महाराष्ट्रातच विकला पाहिजे, ऊस शेजारच्या कारखान्यालाच विकला पाहिजे, धान्यभाजीपाला कृषिउत्पन्न बाजार समितीतच विकला पाहिजे, दूध सोसायटीतच घातले पाहिजे असे शेकडो नियम शेतकऱ्याच्या डोक्यावर लादलेले.

१९९१ साली मला असं वाटलं होतं की, समाजवादाचा अंत झाला आहे म्हणजे आता हे सगळे नियम संपणार; बळीराज्य येणार, शेतकरी स्वतंत्र होणार. आज अत्यंत दुःखानं सांगावसं वाटतं की माझी आता सरकारकडून संपूर्णतः निराशा झाली आहे. या मेळाव्याला निघण्याआधी मी एक काम केलं. पुण्याला एक परिसंवाद भरवला. देशातील सर्व मोठमोठे अर्थशास्त्रज्ञ बोलावले. खुद्द डॉ. मनमोहन सिंगांना तिथं हजर केलं, सबंध एक दिवस. एक दिवसभर मनमोहन सिंग परिसंवादातील चर्चा ऐकायला हजर राहिले. आणि त्यांनी स्पष्टपणे कबूल केलं की, 'आम्ही आजपर्यंत शेतकऱ्याला लुटत होतो हे खरं आहे. पण, ही लूट थांबवायचं काम इतक्या पटकन नाही होणार, धीमे धीमे होईल. यंदा निवडणुकीपर्यंत तर नाहीच होणार. कारण निवडणुकीआधी आम्ही हे काम केलं तर कामगार लोक चिडतील, संप करायला लागतील. त्यामुळे निवडणुकीपर्यंत तरी हे माझ्या हातून काही होणार नाही. निवडणुकीनंतर पाहू.'

निवडणुकीनंतर काय होईल? ते म्हणाले, 'या देशातल्या लोकांची स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची चवच गेलेली आहे. ते गुलामीतच राहाणं पसंत करतात. सरकारनं काहीतरी आमच्या ओंजळीत घालावं याच इच्छेनं लोक जगतात. कोणी दोन रुपये किलोने तांदूळ द्यावे, कोणी रुपयाला झुणकाभाकर द्यावी अशीच या माणसांची अपेक्षा झाली आहे. यांना स्वातंत्र्य द्यायला तुम्ही कुठं चालला?' ते म्हणाले, 'जर का स्वातंत्र्य मिळावं किंवा सरकारनं स्वातंत्र्य द्यावं, लायसन्स-परमिट राज खलास व्हावं, कायदे सगळे बंद व्हावे असं तुम्हाला वाटत असेल ना तर लोकांच्या जिभेला एकदा स्वातंत्र्याची चव लागू द्या.' हे काम राजकीय आहे. जोपर्यंत लोक भीकमागे आहेत तोपर्यंत देश बळीराज्याचा होऊ शकत नाही. कारण बळीराज्याला लायक असे नागरिक मुळी या देशात आहेत कुठे?

खरी गोष्ट आहे. परवा मी उपोषणाची घोषणा केली तेव्हा असाच एक दुसरा अनुभव आला. उपोषणाची घोषणा एका लहान मुद्द्यावर केली आहे. उसाच्या बाबतीमध्ये सरकारने एक कायदा केला. समजा, मी ऊस पिकवणारा शेतकरी आहे. आणि सरकारने दिल्लीला निर्णय घेऊन माझ्या भागात साखर कारखाना काढला तर मी माझा ऊस त्याच कारखान्याला घातला पाहिजे असा हा कायदा आहे. मी त्या सहकारी साखर कारखान्याचा सभासद असलो तरी ऊस त्या कारखान्याला घातलाच पाहिजे आणि सभासद नसलो, त्या कारखान्याशी माझा काही संबंध नसला तरी ऊस त्याच कारखान्याला घातला पाहिजे. माझ्या क्षेत्रातील कारखान्यात माझ्या उसाला ४६० रुपये भाव मिळतो आणि शेजारच्या कारखान्यात १०५० रुपये भाव मिळतो पण सरकारचा कायदा म्हणतो की मी ऊस याच कारखान्याला घातला पाहिजे. हे प्रकरण आम्ही सर्वोच्च न्यायालयात नेलं. आणि सर्वोच्च न्यायालयाचा या झोनबंदीसंबंधी निकाल सरकारच्या बाजूने लागला आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने प्रामाणिकपणे म्हटले आहे की 'आम्ही या प्रश्नावर कायदेशीर निकाल दिला आहे. समाजवादी सरकार, नियंत्रित अर्थव्यवस्था आणि जीवनावश्यक वस्तूंचा कायदा हे लक्षात घेतल्यानंतर सरकारने झोनबंदीचा केलेला नियम बेकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही.' पण पुढे त्यांनीच म्हटलं आहे की, 'हा प्रश्न कोर्टात सोडवण्याचा आहे असं आम्हाला वाटत नाही.'

हा राजकीय प्रश्न आहे आणि जर का शेतकऱ्यांना आपला ऊस कुठं विकायचा याचं स्वातंत्र्य हवं असेल तर तो प्रश्न कोर्टात सुटण्यासारखा नाही तो प्रश्न तुम्हालाच सोडवावा लागेल. हा प्रश्न सोडवण्याकरिता ९१ साली आपण शेगावला मेळावा घेतला. मोठी आशा होती. शेतकऱ्यांनी आपली ताकद दाखवली. सावत्र आईनं करावा तसा नेहरूंनी आणि इंदिरा गांधींनी पन्नास वर्षे शेतकऱ्यांचा छळ केला. पण हा सावत्रपणाचा सगळा जाच सोसूनसुद्धा हा महाराष्ट्रातला शेतकरी परदेशामध्ये द्राक्षं, कापूस, तांदूळ, काय पाहिजे ते निर्यात करू शकतो हे त्यांनी दाखवून दिलं. आणि या सावत्र आईनं ज्या कारखानदारांची कोडकौतुकं केली ते मात्र अपंग झाल्यासारखे बसले आहेत. आम्हाला त्यावेळी आशा वाटली होती की खरंच जर का पी.व्ही.नरसिंहराव देश वाचवायला निघाले असतील तर देश वाचवायचं काम आम्ही करू शकतो. मग लक्षांत आलं की हा केवळ खोटेपणा आहे, यात राजकारण.

मग, आज मी जे काही तुम्हाला सांगायला आलो आहे ते खरं म्हणजे मी औरंगाबाद अधिवेशनातच सांगून टाकलं आहे. 'स्वातंत्र्य मिळवायचं किंवा नाही हे तुमचं तुम्ही ठरवा. तुम्ही स्वतंत्र झाला आहात असं मी जाहिर करतो.' आणि स्वातंत्र्य टिकविण्याकरता काय करावं? तुमच्या घरात जर का कुणी हल्लेखोर आले, तुमच्या आईवर, बहिणीवर, लक्ष्मीवर जर कुणी हात टाकू लागले तर तुम्ही काय करता? कोणत्या तलाठ्याकडे जाता? कोणत्या पंचायत समितीला जाऊन विचारता की माझ्या आईबहिणींचं, बायकोचं संरक्षण मी कसं करू? जर तुम्हाला तुमच्या कापसाचं संरक्षण करायचं असेल, उसाचं संरक्षण करायचं असेल – तुमचं पीक म्हणजे तुमची लक्ष्मी आहे ना मग तिचं संरक्षण कसं करायचं हा प्रश्न विचारण्यासाठी

तुम्ही मुख्यमंत्र्यांकडे जाऊ नका, पंतप्रधानांकडे जाऊ नका आणि माझ्याकडेही येऊ नका. तुमच्या हाती जे हत्यार सापडेल ते घेऊन तुमच्या लक्ष्मीचं संरक्षण करण्याकरता तुम्ही तयार व्हा.' हा औरंगाबादच्या अधिवेशनाचा निर्णय आहे.

मी म्हटलं आणि लोकांनी ऐकलं. दोनचार तिरीमिरीत आलेली कार्यकर्ती मंडळी पुढे आली आणि बाकी सगळे घरी जाऊन गोधडी घेऊन झोपले.

आणि आज, नागपूरला गेल्या मार्चमध्ये आलेल्या जीवघेण्या आजारातून सावरल्यानंतर आणि काहीतरी बोलण्याची, करण्याची अंगात ताकद आली आहे असं वाटल्यानंतर मी जो निर्णय घेतला तो कार्यकारिणीला न विचारता घेतला ही गोष्ट खरी आहे. महात्मा गांधींनी उपोषणाचं तंत्र सांगितलं त्यात म्हटलं आहे की उपोषणाचं हत्यार हे कोणत्याही एका व्यक्तीनं आपल्या आतल्या आवाजाला विचारून हाती घ्यायचं असतं, कार्यकारिणीला विचारून नव्हे.

कोणतीही कार्यकारिणी कोणाही माणसाला प्राण जाईपर्यंत उपोषण कर असा आदेश देऊ शकत नाही. हा निर्णय ज्या त्या व्यक्तीने घ्यायचा असतो.

मी हे हत्यार हाती घेतलं याचं कारण काय? समाजवादानं वाटोळं झालेलं आहे हे सिद्ध झालं, बळीराज्य येत आहे, खुली व्यवस्था येते आहे हे दिसत असतांना काय अभद्र गोष्ट घडली! सांगलीच्या मेळाव्यामध्ये मी म्हटलं होतं, 'भावांनो, बहिणींनो बळीराज्य येतं आहे, पण हे बळीराज्य तुमच्या हातातून अलगद उचलून नेण्याकरता जातीयवादी गिधाडं तुमच्याभोवती घिरट्या घालीत आहेत. भगव्या रंगाची, हिरव्या रंगाची, निळ्या रंगाची, पिवळ्या रंगाची ही जातीयवादी गिधाडं बळीराज्य उचलून नेतील.' मी तुम्हाला धोक्याची सूचना दिली आणि तरीसुद्धा ही गिधाडं आली आणि त्यांनी तुमच्या हातातोंडाशी आलेलं बळीराज्य हिसकावून नेलं. मी माझं घर, सर्वस्व पणाला लावून पंधरावीस वर्षं काम केलं. आता माझ्याकडे जे काही उरलं आहे ते म्हणजे मी स्वतः, माझा देह. हा पणाला लावण्यापलिकडे माझ्या हाती दुसरं हत्यार उरलेलं नाही म्हणून हा निर्णय मी घेतला आहे. निर्णय माझा आहे, जबाबदारी आहे, आणि आज मी तुमच्या समोर स्पष्ट सांगतो. १४ डिसेंबरला सकाळी १० वाजता औरंगाबादला हे उपोषण चालू होणार आहे. आणि कोणत्याही वायफळ आश्वासनाने थांबणार नाही. उसाच्या झोनबंदीचा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे की महाराष्ट्रात शेकडो टन नाही, हजारो टन ऊस वाळून चालला आहे. आणि यावेळी जर का कोणी म्हणालं की बघू आमची विधानसभा संपल्यानंतर, २५ डिसेंबरनंतर विचार करू तर काय केलं पाहिजे? परवा पुण्यात एका जाहिरसभेत हिंदुहृदयसम्राट बाळासहोब ठाकरे स्वतः म्हणाले की, 'जर का लोकांची निकडीची गरज असेल आणि कुणी म्हणायला लागलं की आज बघू, उद्या बघू तर शिवशाहीत अशा माणसाचे हात छाटले जातील.' झोनबंदीच्या या प्रश्नावर 'नंतर' बघू म्हणणारांचे हात छाटून माझ्यासमोर ठेवले तरच मी उपोषण पुढे ढकलण्याचा विचार करीन, एरवी उपोषणाचा विचार पुढे ढकलला जाऊच शकत नाही.

स्वातंत्र्याची सुरुवात आज होते आहे. मी आज तुम्हाला मुद्दाम येथे बोलावले आहे. आपण कापसाच्या प्रश्नावर दहा वर्षे लढलो. आता कापसाकरिता नाही, स्वातंत्र्याचा हक्क बजावण्याकरिता हातामध्ये मूठभर कापूस घेऊन, पिशवीभर कापूस घेऊन का होईना आपण सीमापार पांढुर्ण्याला जाणार आहेत. पोलिस काय करतात पाहू? मला काय कायदे आहेत माहित नाही. ज्यांना भीती वाटत असेल त्यांची आमच्याबरोबर येण्याची गरज नाही. पण ज्यांना भीती नसेल त्यांना निमंत्रण आहे. आपली स्वातंत्र्याची ज्योत पांढुर्ण्यापर्यंत म्हणजे मध्यप्रदेशापर्यंत पोहोचविण्याचे काम आपल्याला करायचे आहे. कापसाच्या बेड्या तोडायला सुरुवात करायची आहे.

हा कार्यक्रम आटोपला की मी पुण्याला जाणार आहे. तिथे देशीविदेशी तज्ज्ञांच्या परिसंवादात बळीराज्यासंदर्भातच बोलणार आहे. आणि मग पुण्याहून औरंगाबादला जाणार आहे. १४ डिसेंबरला सकाळी १० वाजता माझे उपोषण सुरू होणार आहे. गेल्या पंधरावीस वर्षांत मी आणि माझ्या अनेक सहकाऱ्यांनी केलेल्या तपस्येला योग्य फळ यावं यासाठी जे करणं अपरिहार्य आहे असं वाटलं, जे मी केलं नाही तर यानंतर जन्मभर मी दुःखी राहीन असं वाटलं ते करायला मी सज्ज झालो आहे. आता यापुढे तुम्ही काय करायचं? गांधीजींनी बेचाळीस साली म्हटल्याप्रमाणे, 'करा किंवा मरा.' पण पुन्हा पारतंत्र्यांमध्ये गुलाम म्हणून जगण्याकरिता परत येऊ नका.

●

## अर्थशास्त्रात काय शिकवतात?

शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये व हितचिंतकांमध्ये ज्यांनी ज्यांनी महाविद्यालयीन पातळीपर्यंत तरी अर्थशास्त्र या विषयाचा अभ्यास केला आहे अशा सर्वांचे एक चर्चासत्र आयोजित करावयाचे आहे.

या देशातील विद्यापीठे आपल्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राच्या नावाखाली काय शिकवितात, जे शिकवितात ते रास्त का विकृत आहे, योग्य अभ्यासक्रम कसा असावा अशा विविध विषयांवर या सत्रात चर्चा घडवून आणावयाची आहे.

तरी, अर्थशास्त्राचा किमान पदवीपर्यंत अभ्यास केलेल्या सर्व शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी आपापली माहिती – नाव, संपूर्ण पत्ता, वय, शिक्षण, व्यवसाय – खालील पत्त्यावर पोस्टकार्डावर लिहून पाठवावी ही विनंती. पोस्ट कार्डावर अर्थशास्त्रात काय शिकवतात? – चर्चासत्र असे लिहावे.

**डॉ. मानवेंद्र काचोळे,**
'राही', शिवाजी हायस्कूलसमोर,
खोकडपुरा, औरंगाबाद.

## पळून कसे चालेल?

**दुराचार, कपटी धार्मिक भाषा, दांभिकता फोफावत आहे आणि अगदी वरच्या थरातील माणसापासून कमनशिबी गरीबापर्यंत सर्वांमध्येच नैतिक भान, उरलेले नाही हे समोर दिसत असतांना परिस्थिती सुधारण्यासाठी सुरू केलेल्या लढाईतून पळ काढण्याचा विचारसुद्धा माझ्या मनात येऊ शकत नाही – मी वृद्ध, अशक्त आणि असमर्थ झालो असलो तरी!**

**(राजाजी अर्थात् चक्रवर्ती राजगोपालाचारी – वयाच्या ९३ व्या वर्षी)**

# ७. नेपोलियनची हुकूमशाही

या वर्षीचा हिवाळा कडक होता. वादळाच्या थैमानानंतर बर्फ पडण्यास सुरूवात झाली. घनदाट धुके पडले. त्यामुळे प्राण्याना काम करणे कष्टदायक होते. त्याच्यांत पूर्वीसारखी उमेदही राहीली नव्हती. ते थंडीने गारठून जात आणि भुकेने व्याकुळ होत. फक्त क्लोवर आणि बॉक्सरने धीर सोडला नव्हता. श्रमाची प्रतिष्ठा आणि सेवेतील आनंद या विषयावर स्क्वीलर फार छान भाषणे करी. पण त्याच्या भाषणांपेक्षा बॉक्सरच्या तुफानी शक्तीतून आणि त्याच्या 'मी अधिक कष्ट करीन!' या घोषणेतून प्राण्यांना अधिक स्फूर्ती मिळे.

जानेवारीपासून अन्नधान्याचा तुटवडा चांगलाच जाणवू लागला. धान्याच्या रेशनमध्ये एकदम मोठ्या प्रमाणावर कपात करण्यात आली, उपासमारीच्या जबड्यात राहून प्राणी जगत होते. अर्थातच ही वस्तुस्थिती बाह्य जगापासून दडवून ठेवण्याचा नेपोलियनने फार खटाटोप केला. पण जानेवारीच्या अखेरीला बाहेरून धान्याची आयात करणे भाग आहे असे तीव्रतेने वाटू लागले.

एका रविवारी सकाळी स्क्वीलरने घोषणा केली की 'कोंबड्यांनी सर्व अंडी आमच्या स्वाधीन केली पाहिजेत. दर आठवड्याला चारशे अंडी पुरवण्याचा एक करार नेपोलियनने व्हिम्परमार्फत केला आहे. यातून जी रक्कम मिळेल ती धान्य आणि मैदा बाहेरून आयात करण्यासाठी वापरण्यात येईल.' कोंबड्यांनी हे ऐकल्याबरोबर जिवाच्या आकांताने ओरडा केला. असा त्याग करण्याचा प्रसंग उद्भवणे शक्य आहे असा इशारा पूर्वी नेपोलियनने दिला होता. पण तो खरोखरच उद्भवेल असे कुणाला वाटले नव्हते. कोंबड्यांची अंडी काढून घेणे हा सरळ सरळ खुनाचा प्रकार होता. त्यामुळे या योजनेला कोंबड्यांनी विरोध केला. त्यांनी एक वेगळाच मार्ग अवलंबिला. त्यांनी छपरांच्या वाशांवर अंडी घालण्यास सुरवात केली. ही अंडी खाली पडत आणि फुटून जात. यावर नेपोलियनने निर्दयपणे कारवाई केली. त्याने कोंबड्यांचे रेशन बंद केले. पाच दिवस कोंबड्यांनी टिकाव धरला. नंतर मात्र त्यांनी शरणागती पत्करली आणि पूर्वीप्रमाणे खुराड्यात अंडी घालू लागल्या. या दरम्यान नऊ कोंबड्या मरून गेल्या. कराराप्रमाणे अंडी पाठविण्यात येऊ लागली. ही अंडी नेण्यासाठी एका व्यापाऱ्याची व्हॅन कृषिसंस्थेत येऊ लागली.

वसंतऋतूत अचानक एक धक्कादायक बातमी प्राण्यांच्या कानावर आली की स्नोबॉल गुप्तपणे रात्री कृषीसंस्थेत येत होता! या बातमीने प्राणी इतके अस्वस्थ झाले की रात्री आपआपल्या गोठ्यात, तबेल्यात त्यांना झोप येईना. स्नोबॉलच्या घातपाती कारवायांचे वर्णन ऐकून प्राण्यांना तो एक भूत-पिशाच्च वाटू लागला.

ऐके दिवशी संध्याकाळी स्क्वीलरने सर्व प्राण्यांना एकत्र केले आणि म्हणाला, 'मला आज तुम्हाला भयंकर बातमी सांगावयाची आहे!' थोडा बैचेन झाल्याचा हावभाव करून तो पुढे म्हणाला, 'कॉम्रेड्स! स्नोबॉल, फ्रेडरिकला - आपल्या शत्रूला फितूर झाला आहे. आपल्यावर हल्ला चढवण्याची आणि ही शेतवाडी आपल्याजवळून हिरावून घेण्याची कारस्थाने फ्रेडरिक रचत आहे. स्नोबॉल हा बंडखारीचा उद्योग केवळ भपक्यासाठी आणि स्वतःच्या अतिरेकी महत्त्वाकांक्षेपोटी करीत आहे असा आपला आतापर्यतचा समज होता पण बंधूनो स्नोबॉल सुरूवातीपासून जोन्सबरोबर संगनमताने वागत होता. तो आपल्या इथे होता तेव्हापासूनच जोन्सचा गुप्तहेर आणि हस्तक म्हणून काम करीत होता! त्याचे जे कागदपत्र इथे जे मागे राहिले त्यावरून हे सिद्ध झाले आहे. त्यावरून बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला आहे.

कॉम्रेड्स! ही गोष्ट आपण स्वतःच्याच डोळ्यांनी पाहिली आहे की गोठ्याजवळच्या लढाईत आपला पराभव आणि नाश होण्यासाठी त्याने काय प्रयत्न केले. आता त्याच्या दुर्दैवाने या प्रयत्नांना यश आले नाही ही गोष्ट वेगळी! ' हे ऐकून प्राण्याची मती गुंग झाली. कारण त्यांनी स्ततःच्या डोळ्यांनी पाहिले होते की स्नोबॉलनेच युद्धात कशी व्यूहरचना केली होती. प्रत्येक टप्पात त्याने कसा धीर दिला, जोन्सच्या बंदुकीच्या छर्यांने झालेल्या पाठीवरच्या जखमेतून रक्त ओघळत असतानाही त्याने कशी झुंज दिली! स्नोबॉल जर जोन्सचा हस्तक होता तर हे कसे घडले? असा विचार त्यांना सतावत होता. कधीही प्रश्न न विचारणारा बॉक्सरही कोड्यात पडला. त्याने आपले पुढचे खूर अंगाखाली घेऊन डोळे मिटले आणि अत्यंत परिश्रमाने आपल्या विचारांची साखळी जुळवण्याचा प्रयत्न केला.

तो म्हणाला, 'माझा यावर विश्वास बसत नाही. कारण गोठ्याजवळच्या लढाईत स्नोबॉलने पराक्रमाची शर्त केली हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. शिवाय लढाईनंतर आपणच त्याला 'पशुनायक प्रथम श्रेणी' हा किताब दिला नव्हता का?'

स्क्वीलर उतरला, 'कॉम्रेडस्, ती आपली चूक होती. आज आपल्याला सापडलेल्या कागदपत्रांवरून असा प्रकाश पडतो की स्नोबॉल आपल्याला भुलवून सर्वनाशाकडे नेत होता.'

'पण तो स्वतः जखमी झाला होता.' बॉक्सर म्हणाला, 'त्याच्या अंगातून रक्ताच्या धारा ओघळत असतानासुद्धा तो धावत होता.'

'अहो हे सगळे त्याने योजूनच केले होते.' स्क्वीलर ओरडून म्हणाला, 'जोन्सने झाडलेली गोळी त्याला केवळ चाटून गेली हे स्वतःच त्याने लिहून ठेवलेले आहे. ते मी तुम्हाला दाखविले असते पण तुम्हाला वाचता येत नाही. त्यांनी असा डाव रचला होता की लढाईत ऐन मोक्याच्या क्षणी स्नोबॉलने माघार घ्यायची आणि सर्व प्राण्यांना पळून जाण्याचा इशारा द्यायचा आणि सर्व प्रदेश शत्रूच्या ताब्यात द्यायचा. त्याचा डाव यशस्वी झालाही असता पण आपल्यात महान नेता नेपोलियन असल्यानेच आपण वाचलो. आपण लढाई हरतो आहेत असे दिसताच महान नेता नेपोलियन 'मानवता मुर्दाबाद' अशा वीरश्रीच्या घोषणा देत जोन्सवर तूटून पडला. हे तुम्हाला आठवत नाही काय?'

आता जेव्हा स्क्वीलरने प्रसंगाचे तंतोतंत वर्णन केले तेव्हा प्राण्यांना खरेच आपल्याला आठवते आहे असू वाटू लागले. परंतु बॉक्सर अजूनही बैचेन होता, शेवटी तो म्हणाला, 'स्नोबॉल सुरूवातीपासूनच देशद्रोही होता यावर माझा विश्वास नाही. नंतरच्या काळात त्याने काय केले ही गोष्ट वेगळी. पण गोठ्याजवळच्या लढाईत त्याने चांगली झुंज दिली.'

यावर एकेक शब्द सावकाश उच्चारीत स्क्वीलर ठामपणे म्हणाला, 'आपला महान नेता नेपोलियन याने निश्चयपूर्वक सांगितले आहे – कॉम्रेड्स – की, स्नोबॉल सुरवातीपासूनच शत्रूचा हस्तक होता.'

'तसे असेल तर गोष्ट वेगळी!' बॉक्सर म्हणाला, 'कॉम्रेड नेपोलियन जर असे सांगत असेल तर ते बरोबरच आहे!

'ठीक! बंधुंनो अशी निष्ठा पाहिजे' स्क्वीलर म्हणाला.

पण आपल्या लुकलुकत्या डोळ्यांनी त्याने बॉक्सरकडे एक तिरस्काराचा कटाक्ष टाकला.

चार दिवसानंतर एका संध्याकाळी नेपोलियनने सर्व प्राण्यांना एकत्र जमण्याचा हुकूम दिला. सर्वजण एकत्र जमताच त्याने दर्शन दिले. तेव्हा त्याच्या अंगावर दोन पदके लटकत होती. (त्याने अलीकडेच स्वतःला पशुनायक प्रथमश्रेणी व पशुनायक द्वितीय श्रेणी हे किताब बहाल करून घेतले होते.) त्याच्याभोवती त्याची नऊ कुत्री होती. त्यांच्या भयंकर गुरगुराटाने प्राण्यांच्या काळजाचे पाणीपाणी होत होते. आता काहीतरी भयंकर प्रकार होणार अशा भीतीने दबकत, थरकापत ते आपपआपल्या जागी बसले.

नेपालियन उभा राहिला आणि त्याने श्रोतृवर्गावरून कठोरपणे नजर फिरविली. त्याने अचानक तोंडाने कर्कश्श शीळ फुंकली. ताबडतोब कुत्र्यानी झेप घेतली आणि समोरच्या चार तरूण डुकरांचे कान जबड्यात पकडून त्यांना नेपोलियनच्या पायाशी आणून टाकले. त्यानंतर आणखी एक आश्चर्याची गोष्ट झाली आणि त्याने सर्व प्राणी स्तंभित झाले. तीन कुत्री बॉक्सरवरच झेपावली. पण बॉक्सरने आपला एक पाय उचलून एका कुत्र्याला पायाखाली दाबून धरले. ते केंकाटू लागले. तसे उरलेले दोघे मागच्या पायात शेपट्या घालून पळाले.

ही धामधूम तात्पुरती थांबली, नेपालियनच्या पायाशी आणून टाकलेली चार डुकरे मात्र अजून तिथे थरकापत उभी होती. त्यांच्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा अपराधीपणाची भावना व्यक्त करीत होती. रविवारच्या सभा बंद करण्यात विरोध करणारीच ही चार डुकरं होती.

## जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

**पूर्वसूत्र**

**स्नोबॉलची हकालपट्टी झाल्यानंतर नेपोलियनची सत्ता सुरू झाली. राज्यात घडणाऱ्या कोणत्याही अपघाताला स्नोबॉल जबाबदार असल्याचे सांगण्यात येऊ लागले. मनात शंका बाळगून प्राणी राज्यासाठी कष्ट करीतच राहिले.**

नेपोलियनने काही सांगण्याच्या आधीच त्या डुकराने कबूल केले की 'स्नोबॉलची हकालपट्टी करण्यात आल्यापासून आम्ही त्याच्याशी संधान बांधले आहे. पवनचक्की उद्ध्वस्त करण्याच्या कारस्थानात आम्ही त्याला सामील होतो.' त्यांचा कबुलीजवाब संपताच कुत्र्यांनी त्यांच्यावर झेप घेऊन तत्परतेने त्यांचे नरडे फोडून त्यांना ठार केले.

त्यानंतर अंड्यांच्या प्रश्नावरून बंड करणाऱ्या तीन कोंबड्यांनी कबुलीजवाब दिला की स्नोबॉल आपल्या स्वप्नात येऊन चिथावणी देतो. ताबडतोब त्याचीही कत्तल करण्यात आली. त्यानंतर धान्याची कणसे चोरल्याबद्दल एका बदकाने कबुलीजवाब दिला. एका मेंढराने पिण्याच्या पाण्याच्या तलावात लघवी केल्याचा कबुलीजवाब दिला. स्नोबॉलच्या चिथावणीनेच असे केल्याचे त्याने सांगितले. या सर्वांची जागच्याजागी खांडोळी करण्यात आली. नेपोलियनच्या पायाशी प्रेताचा खच पडला. जोन्सच्या हकालपट्टीनंतर जिथे रक्ताचा वास आला नव्हता तिथे सारे वातावरण रक्ताच्या उग्र दर्पाने भरून गेले.

हे सारे संपले तेव्हा कुत्रे आणि डुकरे सोडून इतर उरलेले प्राणी एकदम पटापट निघून गेले. त्यांना जबरदस्त धक्का बसला होता. त्यांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली होती. ते इतके दिङ्मूढ झाले होते की या प्राण्यांनी केलेला विश्वासघात अधिक धक्कादायक आहे की त्याबद्दल त्यांना देण्यात आलेली क्रूर शिक्षा जास्त धक्कादायक आहे हेही त्यांना उमगत नव्हते. पूर्वी जोन्सच्या कारकीर्दीत असे भयंकर रक्तपात झाले नव्हते असे नाही. पण आता आपल्याचपैकी कुणीतरी रक्ताचे पाट वाहवावेत ही गोष्ट अत्यंत वाईट आहे असे त्या सर्वांना वाटत होते. ते प्राणी टेकडीपाशी पवनचक्कीच्या बांधकामाजवळ येऊन थांबले. तिथे ते सारे गर्दीगर्दीने खेटून बसले. जणु काही त्यांना कसली तरी ऊब हवी होती. क्लोवर, म्युरीअल, बेंजामिन, गाई, मेंढरे, कोंबड्या, बदके सारेजण बराच वेळ गप्प बसून राहीले. एकटा बॉक्सर आपली लांब काळी शेपटी हलवीत, चुळबुळत उभा होता, काही वेळा आश्चर्य व्यक्त करीत होता तर मधूनच सुस्कारे सोडीत होता. अखेरीस तो म्हणाला, 'हे माझ्या लक्षातच येत नाही. आपल्या इथे असे काही घडेल असे कुणी मला सांगितले असते तर माझा विश्वासच बसला नसता. मला वाटते हे घडते आहे ते आपल्यातील दोषामुळेच. यावर एकच उपाय. तो म्हणजे आपण सर्वांनी अधिक कष्ट करायला पाहिजेत. यापुढे मी दररोज सकाळी पूर्ण एक तास लौकर उठेन.' इतके बोलून टापा टाकीत तो दगडाच्या खाणीकडे निघून गेला. दगडाची दोन ओझी त्याने पवनचक्कीकडे आणून टाकली आणि तो विश्रांतीसाठी तबेल्याकडे गेला. सगळे प्राणी गर्दी करून क्लोवरभोवती बसले होते. ते बसले होते त्या स्थानावरून शेतीवाडीचा सारा परिसर दिसत होता. ती लांब लांब कुरणे, नांगरट झालेल्या जमिनी, गहू पेरलेल्या जमिनी, गव्हाची हिरवी रोपे सर्व त्यांना दिसत होते. टेकडीच्या वरून क्लोवरने जेव्हा त्या साऱ्या परिसरावर नजर फिरवली तेव्हा तिचे डोळे भरून आले. तिच्या भावना तिला व्यक्त करता आल्या असत्या तर तिने म्हटले असते, 'काही वर्षांपूर्वी मानवी सत्तेचे जोखड झुगारून टाकण्यासाठी एकजुटीने आम्ही लढा उभारला होता. तेव्हा पुढे अशी भयानक कत्तलीची दृश्ये आपल्याला बघावी लागतील अशी स्वप्नातही कल्पना नव्हती. माझ्या डोळ्यांपुढे भविष्यकाळाचे एक वेगळेच चित्र तरंगत होते. ज्या जगात भुकेची वखवख नाही, कडाडणारा चाबुक नाही, विषमतेची दरी नाही, दुर्बलांची पिळवणूक नाही असे जग त्या चित्रात मी पाहिले होते. याच भावनेने मेजरचे भाषण झाले. त्या रात्री मी त्या बदकांच्या छोट्या पिलांभावती माझ्या मजबूत पायांची तटबंदी घातली होती. आणि आज किती वेगळी स्थिती आहे! आपल्या मनातील गोष्ट उघड बोलण्याचे धाडसही होत नाही. सदैव भेडसावणारी भयंकर कुत्री गुरगुरत हिंडताहेत. आपल्या भाईबंधांकडून धक्कादायक गुन्हे कबूल करून घेतले जाताहेत. आणि त्यांची खांडोळी केली जात आहे.' क्लोवरच्या मनात बंडाचे विचार नव्हते. तिला वाटत होते की काहीही झाले तरी आपण अविचल निष्ठा ठेवली पाहिजे. नोपोलियनचे नेतृत्व मानले पाहिजे. पण ज्याकरिता आपण घाम गाळला, पवनचक्कीचे बांधकाम चालू ठेवले, जोन्सच्या बंदुकीतील गोळ्या झेलल्या ते हे नव्हे. विचार व्यक्त करण्यासाठी तिला शब्दच सुचेनात, शेवटी या भावना व्यक्त करण्याचा पर्याय म्हणून तिने 'देशातील पशूंनो' हे गाणे म्हणण्यास सुरुवात केली. तिच्याभावती बसलेल्या प्राण्यांनीही तिच्या सुरात सूर मिसळला. एकतानतेने आणि कमालीच्या विमनस्क अवस्थेत त्यांनी हे गीत म्हटले.

तोपर्यंत स्क्वीलर दोन कुत्र्यासह येऊन धडकला होता. आपल्याला अतिशय महत्त्वाचे काही सांगायचे आहे असा आविर्भाव करीत तो म्हणाला, "'देशातील पशूंनो' हे गीत नेपोलियनने एका खास वटहुकुमाद्वारे रद्द केले आहे."

सर्व प्राणी आश्चर्यचकीत झाले. 'पण का?' म्युरीअलने विचारले. 'आता त्याची गरज उरली नाही.' स्क्वीलर कठोर आवाजात म्हणाला, देशातील पशुंनो, हे क्रांतिगीत होते. क्रांती आता पूर्ण झाली आहे. आज संध्याकाळी देशद्रोह्यांना दिलेला दंड ही क्रांतीतील शेवटची घटना होती.''

अशा प्रकारे 'देशातील पशूंनो' या गीताचे सूर कायमचे बंद पडले. त्याऐवजी दुसरे गीत सुरू करण्यात आले. मिनिमस या डुक्करकवीने ते रचले होते. त्यांच्या ओळी अशा होत्या,

*'पशु स्वराज्य! पशु स्वराज्य! पशु स्वराज्य!*
*होणार नाही मजकडून इजा कधी त्याला*
*खात्री बाळगा, खात्री बाळगा!'*

ध्वज चढल्यानंतर दर रविवारी सकाळी हे गीत म्हणण्याचा कार्यक्रम होई. हे गीत 'देशातील पशुंनो' या तोडीचे नाही असे का कोण जाणे, पण प्राण्यांना वाटत होते.

(पान ८ वरून)

पांढुर्ण्याहून आपापल्या गावी परतले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, पंतप्रधान, केंद्रीय अर्थमंत्री यांना शरद जोशींनी आपली उपोषणामागची भूमिका फॅक्सद्वारे कळवूनही उसाच्या झोनबंदीविषयी शासनाकडून काही हालचाल होईना.

१३ डिसेंबर रोजी शरद जोशी नागपूरहून विमानाने पुणयाला परतले. तिथे 'किसान ९५' या प्रदर्शनाच्या निमित्ताने योजलेल्या देशविदेशी कृषि, कृषिअर्थशास्त्र तज्ज्ञांच्या परिसंवादात 'खुल्या व्यवस्थेतील शेतकऱ्याचे स्थान' याविषयी त्यांनी आपली मांडणी केली. शेतकरी स्वतंत्र होऊ इच्छितो आहे, तो स्वतंत्र होऊही शकतो पण शासनमात्र त्यांना हातीपायी बेड्यातच जखडून ठेवू पाहात आहे हे त्यांनी या परिसंवादात विशद केले.

१३ डिसेंबरच्या रात्री लगेच ते औरंगाबाद येथे रवाना झाले आणि १४ डिसेंबर १९९५ रोजी सकाळी १० वाजता औरंगाबादेतील टाकसाळी मंगल कार्यालयात त्यांचे उपोषण सुरू झाले.

**आणि मराठवाडा पेटला....**

१४ डिसेंबरला शरद जोशींचे अनिश्चितकालीन उपोषण सुरू झाले आणि १५ डिसेंबरपासून महाराष्ट्रभर एस्.टी. बस रोको आंदोलन सुरू झाले.

कोल्हापूरला १४ डिसेंबर रोजीच कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी झोनबंदी उठविण्याच्या मागणीसाठी कोल्हापूरातील साखर संचालकांच्या कार्यालयाला टाळे लावण्याचा प्रयत्न केला त्यावेळी पोलिसांनी केलेल्या लाठीमारात ३५ कार्यकर्ते जखमी झाले. पोलिसांनी १०४ कार्यकर्त्यांना अटक केली आणि दुसऱ्या दिवशी रात्री ११ वाजेपर्यंत कोठडीत डांबून ठेवले. तरीही जिल्ह्यात १५ तारखेला एस्.टी. बंद आंदोलन सुरूच होते.

१५ डिसेंबरपासून सर्वच जिल्ह्यांत एस्.टी. बस रोको आंदोलन सुरू झाले. नांदेड, लातूर, परभणी, बीड या जिल्ह्यांत आंदोलनाचे स्वरूप उग्र होते, शरद जोशींच्या उपोषणाचा कालावधी जसजसा दिवसादिवसाने वढू लागला तसतसे हे स्वरूप अधिकाधिक उग्र होऊ लागले. नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यांतही आंदोलन वेग घेऊ लागले. अनेक ठिकाणी एस्.टी. गाड्या अडविणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिस अटक करू लागले. हिंगोलीला एस्.टी. स्टँडसमोर आंदोलन करणाऱ्या डॉ. पातुरकर, दत्तराव नाईक आदि १४ कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडून त्यांच्याविरुद्ध खटला चालवून १४ दिवसांचा तुरुंगवास भोगण्यासाठी तुरुंगातसुद्धा पाठवले. औरंगाबाद, अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा, नागपूर,

यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांतही कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी आंदोलन करून एस्.टी. वाहतूक बंद पाडली.

सर्वच वर्तमानपत्रांत या आंदोलनाने हिंसक वळण घेतल्याच्या, बसगाड्या जाळल्याच्या ठळक मथळ्यांच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या पण या प्रकारांत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना अटक झाल्याची माहितीमात्र कोठे सापडली नाही.

शरद जोशींच्या उपोषणाचा चौथा दिवस संपत आला, त्यांच्या प्रकृतीला धोका निर्माण झाला तरीही सरकारी पातळीवर काहीच हालचाल दिसेना, विधानसभेत डाळींचाच घोटाळा चालू. हे पाहून आंदोलक शेतकरी आक्रमक होतील अशी भीती वाटू लागली म्हणून शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे यांनी सरकारला इशारा दिला की, 'आता निर्णय घेण्यात दिरंगाई झाली तर आम्हाला आंदोलन हातात ठेवणे कठीण जाईल, शेतकऱ्यांच्या दृष्टीने शरद जोशींचे प्राण महत्त्वाचे आहे त्यासाठी ते काहीही करतील.' अध्यक्षांच्या या इशाऱ्याला वजन देण्यासाठी नांदेड जिल्हा शेतकरी संघटनेने १८ डिसेंबर रोजी 'नांदेड जिल्हा बंद'चा कार्यक्रम घोषित केला.

१८ तारखेला नांदेड शहर आणि जिल्ह्यातील सर्व ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला.

शेवटी १८ तारखेला सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे राज्यमंत्री श्री. अशोक पाटील डोणगावकर आणि मुख्यमंत्र्यांचे उपसचीव यांच्यासह औरंगाबादला श्री. शरद जोशी यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी आले. काही काळ चर्चा झाल्यानंतर उपमुख्यमंत्री बाहेर जाऊन फोनवरून मुख्यमंत्र्यांशी बोलून आले आणि पुन्हा चर्चा सुरू झाली. चर्चा संपल्यानंतर बाहेर येऊन चर्चा यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले, पण विधानसभेचे अधिवेशन चालू असल्याने सभागृहाबाहेर काही घोषणा करणे उचित होणार नाही म्हणून घोषणा करण्यास असमर्थ असल्याचे सांगितले. शरद जोशींनीही बाहेर येऊन सांगितले की आमची चर्चा समाधानकारक झाली आणि उपमुख्यमंत्र्यांची घोषणा करण्याबाबतची अडचण लक्षात घेता उपोषण सोडत असल्याचे त्यांनी जाहिर केले. त्यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते लिंबुपाणी घेऊन आपले उपोषण रात्री ८ वाजून २० मिनिटांनी सोडले. तेव्हा शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेच्या विजयाच्या घोषणा दिल्या.

संपूर्ण उपोषण काळात डॉ. अनिल बोराळकर, डॉ. माणिक देशपांडे व डॉ. शाम अष्टेकर शरद जोशींच्या प्रकृतीवर दक्षतेने लक्ष ठेवून होते.

शरद जोशींनी उपमुख्यमंत्र्यांसमोर पुढील तीन प्रस्ताव ठेवले होते.

**प्रस्ताव**

१) झोनबंदी पूर्णतः उठवणे.

२) झोनबंदी तात्काळ स्थगित करणे आणि

अ) झोनबंदीसंबंधी अभ्यास समिती नेमावी

ब) या अभ्यस समितीच्या शिफारशींवर निर्णय मार्च ९६ पूर्वी लागू करावा.

३) झोनबंदी बिगरसदस्यांपुरती एक वर्षासाठी उठवणे आणि

अ) खुले (Universal) सदस्यत्वाचे तत्व स्वीकारणे. क्षेत्रातील प्रत्येक ऊस उत्पादकास आपोआप सदस्यत्व मिळणे. आणि सदस्यत्व सोडण्याची मुभा असणे.

ब) झोनबंदीसंबंधी अभ्यास समिती नेमावी. या समितीचा निर्णय मार्च ९६ पूर्वी लागू करावा.

क) अभ्यास समितीच्या कक्षेत सहकारी कायदा कलम ४८-ए आणि कृषि उत्पन्न बाजार समिती कायदा यांचाही अंतर्भाव करावा.

ड) एप्रिल ९६ पूर्वी सहकारी कायदा कलम ४८-ए संबंधीचा निर्णय लागू करावा.

इ) कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्या संदर्भीचा निर्णय ऑगस्ट ९६ पूर्वी लागू करावा.

यापैकी तिसरा प्रस्ताव उपमुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या संमतीने स्वीकारला. आणि तशी घोषणा सहकारमंत्र्यांनी २१ डिसेंबर रोजी नागपूर येथे विधानसभेत केली.

शरद जोशींचे उपोषण विजय घेऊन सुटल्याचे कळताच सर्व ठिकाणी आनंद व्यक्त करण्यात आला. हेरले या कोल्हापूर जिल्ह्यातील बळीराज्य गावात १८ तारखेला रात्रीच अकरा वाजता सर्व गावकरी एका ठिकाणी जमले आणि त्यांनी फटाके वाजवून विजयोत्सव साजरा केला.

उपोषणसमाप्तीनंतर दोन दिवसांची विश्रांती घेऊन, डॉक्टरांच्या मनाईला न जुमानता शरद जोशींनी २० ते २४ डिसेंबर असा पाच दिवसांचा दौरा करून औरंगाबाद, परभणी, लातूर, नांदेड, कोल्हापूर-सातारा-सांगली या जिल्ह्यांतील आंदोलक शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. आणि स्वातंत्र्यासाठी लढल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

●

## उपोषणाखेरीज पर्याय उरला नाही

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी 'ऊस झोनबंदी आदेश' रद्द करण्यासाठी चालविलेल्या आंदोलनाला पाठबळ देण्यासाठी उपोषण सुरू करण्याखेरीज माझ्यापुढे काही पर्याय उरला नाही. १९८४ साली महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या या 'झोनबंदी आदेशा'मुळे ऊसउत्पादक शेतकऱ्याला, तो कारखान्याचा सभासद असो अगर नसो, त्याच्या क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्याला, तो कारखाना आजूबाजूच्या कारखान्यांच्या तुलनेत किती भाव देतो इकडे लक्ष न देता, ऊस विकणे/पुरवणे बंधनकारक आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायपीठाने हा आदेश रद्द ठरविला होता, पण त्यावरील अपिलावर निर्णय देतांना आपली 'नियंत्रित अर्थव्यवस्था' आहे असे म्हणून तो आदेश चालू ठेवण्यास मान्यता दिली. मात्र हा निर्णय देतांना हा आदेश अन्याय्य आहे असे म्हणून सर्वोच्च न्यायालयाने 'हे प्रकरण न्यायालयाच्या कक्षेपेक्षा राजकीय कक्षेतील अधिक आहे' असे आपले मत नोंदविले आणि महाराष्ट्र शासनाला सूचना केली की त्यांनी ऊस गाळपाचा हंगाम सुरू होण्याआधी काही उपाययोजना करावी. पण, शासनाने ती सूचना पाळली नाही.

राजकीय सोयीसोयींनी परवाना मिळवून सुरू झालेल्या या कारखान्यांकडून ऊसाला मिळणाऱ्या भावात टनाला १०५० रुपयांपासून ४६० रुपये इतकी प्रचंड तफावत आहे. या विरुद्धचा आपला असंतोष शांततापूर्ण आंदोलनाच्या मार्गाने गेला महिनाभर शेतकरी व्यक्त करीत आहेत.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी २४ नोव्हेंबर १९९५ रोजी शेतकऱ्यांची मागणी जाहिरपणे तत्त्वतः मान्य केली, पण साखरसाम्राज्याच्या दडपणामुळे ते झोनबंदी आदेश रद्द करू इच्छित नाहीत.

शासनाची ही भूमिका आर्थिक सुधारांच्या काळातही चालूच राहिलेल्या, सर्व शेतकरीविरोधी धोरणांचे प्रतीक आहे असे मी मानतो आणि त्याविरुद्ध सर्व सामर्थ्यानिशी लढणे हे माझे कर्तव्य समजतो.

मी औरंगाबाद येथे १४ डिसेंबर १९९५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून माझ्या अनिश्चितकालीन उपोषणाला सुरुवात करणार आहे.

**– शरद जोशी**

*श्री. शरद जोशी यांनी आपल्या उपोषणासंदर्भात पंतप्रधान इत्यादींना पाठविलेल्या फॅक्सपत्राचे स्वैर मराठीकरण*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 28th December, 1995

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 28, 1995

**PNCW 281**

Licence
to post
without
prepayment
**No. 87**

# उपोषणाची यशस्वी सांगता

सरकारच्या, शेतकऱ्यांवरील निर्बंधांचे प्रतिक म्हणून 'उसावरील झोन बंदी'च्या कायद्याविरुद्ध अनिश्चित कालीन उपोषणाची तयारी करूनच श्री. शरद जोशी वर्ध्याहून नरखेडमार्गे पांढुर्ण्याकडे निघालेल्या 'स्वातंत्र्ययात्रे'च्या अग्रभागी चालू लागले.

सीमा ओलांडण्याआधी नरखेड येथे नांदेड, राजुरा, वर्धा व जळगाव येथून आलेल्या स्वातंत्र्य यात्रांचे एकत्रीकरण झाले. कापसावरील सीमाबंदी तोडायचा निर्धार तर सगळ्यांच्या मुद्रेवर होताच, पण दोनच दिवसांनी शरद जोशी उपोषण सुरू करणार असल्याने चिंताही तितकीच होती. कुणीतरी त्यांना उपोषणासारख्या आत्मक्लेशाच्या या मार्गापासून परावृत्त करील आशाही होती.

पण त्याप्रसंगी भाषण करतांना शेतकरी संघटनेचे अध्यक्ष म्हणाले की, "साहेबांनी उपोषण करण्याचा निर्णय व्यक्तिगत अधिकारात घेतला आहे. त्यामुळे, त्यांनी उपोषण करू नये अशी विनंती करण्याचा मला, आपल्याला काही अधिकार नाही. पण आपणसुद्धा आपण काय करायचं हे ठरवू शकतो. उसाच्या झोनबंदीचा प्रश्न न सुटता साहेबांचं उपोषण १४ डिसेंबरला सुरू झालंच तर आपणसुद्धा निर्धार करून या की १५ डिसेंबरच्या सकाळपासून साहेबांचं उपोषण संपेपर्यंत एकही एस्.टी. बस या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात जाण्यासाठी रस्त्यावर चालू देणार नाही." अध्यक्षांनी ही सूचना करताच उपस्थित पंधरावीस हजाराच्या जमावाने तिला उत्स्फूर्तपणे मान्यता दिली.

१२ डिसेंबर १९९५ रोजी नरखेड येथून निघालेली भव्य स्वातंत्र्य यात्रा, एक एक पिशवी कापूस हाती घेतलेल्या शेतकऱ्यांची स्वातंत्र्ययात्रा महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून मध्यप्रदेशातील पांढुर्णा गावी पोहोचली, तेथे मध्यप्रदेशातील चार ते पाच हजार शेतकरी स्त्रीपुरुष यात्रेच्या स्वागतास आले होते. तेथे सर्व कापूस एकत्रित करून त्याची खुल्या बाजारात विक्री करण्यात आली.

आणि शासनाने श्री. शरद जोशींवर खरोखरच उपोषण करण्याची पाळी आणली तर कशा तऱ्हेने 'एस्टी बस बंदी' आंदोलन कसे करायचे याचे आराखडे आखत शेतकरी

(पान ६ वर पहा)

## शेतकरी महिला आघाडी मेळावा

### अकोला ११ व १२ जानेवारी १९९६

शेतकरी महिला आघाडीचे तातडीचे अधिवेशन येत्या फेब्रुवारी १९९६ मध्ये आयोजित करावयाचे आहे.

★ खुली अर्थव्यवस्था आणि त्यातील महिलांचे स्थान,

★ बीजींगच्या जागतिक महिला परिषदेत उमटलेला खुल्या अर्थव्यवस्थेविरोधी सूर

★ देशाच्या आजच्या परिस्थितीत स्त्रियांची भूमिका

अशा महत्त्वाच्या विषयांच्या संदर्भाने या अधिवेशनात शेतकरी महिला आघाडीचा पुढील कार्यक्रम ठरवावयाचा आहे.

या अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी, चर्चेसाठी साहित्य व ठरावांचे प्रस्ताव तयार करण्यासाठी शेतकरी महिला आघाडीचा मेळावा ११ आणि १२ जानेवारी १९९६ रोजी अकोला येथे आयोजित केला आहे. चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व भगिनींनी न चुकता या मेळाव्याला यावे ही आग्रहाची विनंती.

आपली,
**सौ. इंदिरा भानुदास पाटील**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

१. मेळावा ११ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता सुरू होऊन १२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालेल.
२. श्री. शरद जोशी मेळाव्यात दोनही दिवस मार्गदर्शन करतील.
३. अकोला संपर्क : श्री. प्रकाश पोहरे, देशोन्नती
निशांत टॉवर्स, म. गांधी मार्ग, अकोला.
फोन : ०७२४-२७३७७/४३१०८६

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी. - ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**